# रत्नागिरी जिल्हा पोलीस भरती-२०२१

दिनांक :- ३१/०३/२०२३

## उमेदवारांसाठी सुधारीत सर्वसाधारण सुचना

## लेखी चाचणी

- रत्नागिरी जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२१ मधील लेखी परीक्षा करीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दि.२२/०२/२०२३ रोजी रत्नागिरी जिल्हा पोलीस दलाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.
- रत्नागिरी जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२१ ची लेखी परीक्षा दि.०२/०४/२०२३ रोजी रत्नागिरी शहरातील खालील शाळा/महाविद्यालयामध्ये आयोजित केलेली आहे.

| अ.क्र | शाळेचे नाव | उमेदवारांचे चेस्ट क्रमांक |
|---|---|---|
| १. | श्रीमान गंगाधर गोविंद पटवर्धन इंग्लिश मेडीयम स्कुल, गोगटे कॉलेज जवळ, रत्नागिरी. | ००१४ ते ०४२१<br>( पुरुष उमेदवार ) |
| २. | आर.पी.गोगटे कॉलेज, रत्नागिरी. | ०४२३ ते २३६९<br>( पुरुष उमेदवार ) |
| ३. | मिस्त्री हायस्कुल राजिवाडा, गोगटे कॉलेज जवळ, रत्नागिरी. | २३७० ते २९६५<br>( पुरुष उमेदवार ) |
| ४. | श्रीमान भागोजी शेठ, कीर लॉ कॉलेज, गोगटे कॉलेज जवळ, रत्नागिरी. | २९६६ ते ५०६७<br>( पुरुष उमेदवार ) |
| ५. | रा.भा.शिर्के प्रशाला, सन्मित्र नगर, माळनाका रत्नागिरी. | ६००२ ते ६९१३<br>( महिला उमेदवार ) |

- लेखी परीक्षेसाठी महाआयटीकडून प्रवेशपत्र निर्गमीत करण्यात आलेले असून ते https://policerecruitment2022.mahait.org या वेबसाईडवरुन उमेदवारांनी आपला युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन स्पष्ट दिसेल अशी प्रिंट काढावी.
- उमेदवारांनी लेखी परीक्षे करीता दिनांक ०२/०४/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा. त्यांना प्रवेश पत्रात नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर शारीरिक चाचणीवेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र/ओळखपत्र तसेच लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र घेवून वेळेत उपस्थित रहावे तरच परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल.

- उमेदवाराने स्वत:ची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेले आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, पासपोर्ट, महाविद्यालयीन ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैद्य ओळखपत्र, पासपोर्ट साईज दोन फोटो व  ऑनलाईन प्रवेशपत्राची प्रत (हॉल तिकीट) सोबत आणावे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.
- उमेदवाराने परीक्षा केंद्रावर प्रवेश केल्यानंतर हजेरी पटावर (Attendence Sheet) समक्ष स्वत:चा फोटो चिकटवुन त्यापुढील रिकाम्या जागेमध्ये पर्यवेक्षकांच्या समक्ष स्वत:ची स्वाक्षरी करावी.
- लेखी परीक्षा वेळी पेन व पॅड पुरविण्यात येणार असल्याने उमेदवारांनी सोबत येताना अनावश्यक वस्तू आणु नये, आणल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच पुरविण्यात आलेले पॅड व पेन परीक्षा संपल्यावर पर्यवेक्षक यांचेकडे जमा करावयाचे आहे.
- लेखी परीक्षावेळी उमेदवारांनी मोबाईल फोन, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, कॅल्क्युलेटर, नोट पॅड, नोट्स पुस्तके, ईअरफोन, ब्ल्युटूथ, स्मार्ट वॉच तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे, प्रतिबंधक वस्तु स्वत:जवळ बाळगणे पुर्णत: मनाई आहे. अशा वस्तु उमेदवारांकडे आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्या बरोबरच कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
- एखादा उमेदवार लेखी परीक्षेला गैरहजर राहिला तर त्याला पुन्हा लेखी परीक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरीक्त संधी देण्यात येणार नाही. त्याला संपुर्ण भरती प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल.
- उमेदवाराने पोलीस भरती प्रक्रियेमध्ये उध्दट गैरवर्तन / अनुचित प्रकार केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याचा, कॉपी करण्याचा अथवा डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास त्याच क्षणी भरती प्रक्रियेमधून बाद करून कायदेशिर कारवाई करण्यात येईल.
- पोलीस भरती मध्ये नियमबाह्य दबाव तसेच भ्रष्ट आचरण व वर्तणूक करणाऱ्या उमेदवारास अपात्र घोषित करण्यात येईल.
- लेखी चाचणी दरम्यान उमेदवारास कोणत्याही प्रकारची शारीरिक इजा/नुकसान झाल्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.
- उमेदवारांनी कोव्हीड-१९ चे अनुषंगाने शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. सॅनिटायझर, मास्कचा वापर करावा व सुरक्षित अंतर ठेवावे.
- उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट/दलाल, अधिकारी/कर्मचारी यांच्या भुलथापांना/अमिषाला बळी पडू नये. उमेदवाराची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.
- रत्नागिरी जिल्हा पोलीस शिपाई भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, निप:क्षपातीपणे व पारदर्शक (Natura, Impartial & Transparent) होणार असून, दक्षता अधिकारी म्हणून मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र यांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

- पोलीस भरती प्रक्रिया कालावधीत भ्रष्टाचारी प्रवृत्तीच्या लोकांकडून तसेच बोगस दलालांकडुन किंवा अन्य कोणत्याही व्यक्तींकडुन ओळखीचा गैरफायदा घेवुन व तसे ओळखीचे अगर अन्य प्रकारचे आमिष दाखवून कोणी पैशाची मागणी करत असेल किंवा आर्थिक देवाण-घेवाणीचे गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी, सुर्वे सदन, नाचणे रोड,मारुती मंदीर, रत्नागिरी फोन नंबर - ०२३५२-२२२८९३, पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे (पश्चिम) फोन नंबर- ०२२-२५४२७९७९, पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, रत्नागिरी, फोन नंबर-०२३५२-२२५०७७ यापैकी कोणत्याही ठिकाणी समक्ष किंवा दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

- लेखी परीक्षा झाल्यानंतर उत्तर सुची (Answer Key) त्याच दिवशी १२.०० वा. पर्यंत प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना उत्तरसुची संदर्भात काही शंका/आक्षेप असल्यास त्या १६.०० वा. पर्यंत पोलीस नियंत्रण कक्ष रत्नागिरी येथील व्हॉटस्अप क्रमांक ८८८८९०५०२२ किंवा **sp.ratnagiri@mahapolice.gov.in** या ईमेल वर सादर करावयात. त्यानंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

- परीक्षा दरम्याने काही अपरिहार्य कारणास्तव कोणत्याही बाबतीत बदल करण्याचे झाल्यास ते अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

- उमेदवारांनी पोलीस भरती -२०२१ मधील लेखी परीक्षेसंदर्भातील सर्व सुचना व आवश्यक माहिती जाणुन घेण्याकरीता रत्नागिरी जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर वेळोवळी खात्री करावी.

- उमेदवारांना परीक्षा केंद्रावर वेळेत व अचूक पोहचता यावे याकरीता खालील **QR** कोड स्कॅन केल्यानंतर उमेदवाराने स्वत:चा ई-मेल आय डी व नाव टाकून हॉल तिकीट वरील देण्यात आलेले परिक्षा केंद्र निवडावे. परिक्षा केंद्र निवडल्यानंतर गुगल फॉर्मवर देण्यात आलेल्या लोकेशन लिंक वर क्लिक करावे.

रत्नागिरी पोलीस भरती -२०२१

लेखी परीक्षा केंद्र लोकेशन लिंक सिस्टीम **QR** कोड

# रत्नागिरी जिल्हा पोलीस भरती-२०२१

## उमेदवारांसाठी सुचना

रत्नागिरी जिल्हा पोलीस शिपाई भरती -२०२१ मधील लेखी परीक्षा दि.०२/०४/२०२३ रोजी घेण्यात येणार असून लेखी परीक्षेसंदर्भात भ्रष्टाचारी प्रवृत्तीच्या लोकांकडून तसेच बोगस दलालांकडुन किंवा अन्य कोणत्याही व्यक्तींकडुन ओळखीचा गैरफायदा घेवुन व तसे ओळखीचे अगर अन्य प्रकारचे आमिष दाखवून कोणी प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन देतो, लेखी परीक्षेत गुण वाढवुन देतो अगर अन्य कोणत्याही प्रकारे मदत करतो असे सांगुन पैशाची मागणी करत असेल किंवा आर्थिक देवाण-घेवाणीचे गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत खालील दिलेल्या पत्त्यांवर समक्ष तक्रार करावी किंवा दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

पोलीस उप-अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी,
सुर्वे सदन,नाचणे रोड,मारुती मंदीर,रत्नागिरी.
फोन नंबर - ०२३५२-२२२८९३
टोल फ्रि नंबर - १०९८

पोलीस अधीक्षक

ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,
ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे (पश्चिम)

फोन नंबर - ०२२-२५४२७९७९

पोलीस अधीक्षक
पोलीस अधीक्षक कार्यालय,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, रत्नागिरी,
फोन नंबर - ०२३५२-२२५०७७